# मेट्रो ३ : पॅकेज ४ मधील ५ किमी भुयार खणण्यात यश

**मुंबई** : कुलाबा-वांद्रे-सीप्झ या तिसऱ्या संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्गादरम्यानच्या पॅकेज ४ मधील ५ किमी भुयार खणण्यात एमएमआरसीएलला यश आले असून काही महिन्यांपूर्वीच पॅकेज ६ च्या भुयाराचे एक टोक गाठण्यात यश मिळाले होते.



कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो ३ मार्गिकेदरम्यान कृष्णा १, कृष्णा २, कृष्णा ३ या तीन टनेल बोअरिंग मशीन कार्यान्वित आहेत. कृष्णा १ टीबीएमच्या माध्यमातून गडकरी चौक या दादर पश्चिमेकडील गोखले रोडखालील २४५१ मीटर, कृष्णा २ या टीबीएमच्या माध्यमातून एल. जे. रोड आणि बाळ गोविंद दास मार्ग येथील २१३८ मीटर तर कृष्णा ३ या टीबीएमच्या माध्यमातून गॅमन हाऊस, वीर सावरकर मार्ग येथील ४२७ मीटर भुयार खणण्यात यश मिळाले आहे. मेट्रो ३ ही संपूर्ण मार्गिका ३३.५ किमी असून त्यापैकी पॅकेज ४ मधील ५ किमीचे भुयारीकरण करण्यात मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनला यश मिळाले आहे. कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो मार्गिकेचे ७ पॅकेजमध्ये विभाजन करण्यात आले असून मरोळ नाका ते आंतरराष्ट्रीय विमानतळ या पॅकेज ६ मधील १.२६ किमी बोगद्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे. आतापर्यंत एकूण ११ किमीचे काम पूर्ण करण्यात आले आहे. सध्या १७ पैकी १६ टनेल बोअरिंग मशिन्स कार्यरत आहेत. या टीबीएम मशिन्सच्या माध्यमातून दोन्ही दिशेला ५२ किमीचे खोदकाम होणार आहे. ते नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन प्रयत्नशील आहे.